# B.A. Part–III (Semester–VI) Examination
## (Compulsory Language)
## MARATHI

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 80

**सूचना** :— (1) **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(2) सर्व प्रश्नाचे गुण प्रश्नासमोर लिहिलेले आहेत.

1. वि.भि. कोलतेंनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्यकर्तृत्वावर कशाप्रकारे प्रकाश टाकला आहे ?

**किंवा**

गोविंद पानसरेंनी राजर्षी शाहू महाराजांच्या रयतेसाठी केलेल्या दूरदृष्टीचे वर्णन करा. 16

2. भाऊसाहेबांच्या बखरीच्या आधारे दत्ताजी शिंदेच्या कर्तव्याचे मूल्यमापन करा.

**किंवा**

मारुती चित्तपल्ली यांनी 'अरणी' कथेतून वुड्स आणि अरणीच्या प्रेमाचे कशाप्रकारे चित्रण केले आहे ? 16

3. (अ) मराठी भाषेविषयीचा नितांत आदर फादर स्टिफन्स कशा शब्दातून अभिव्यक्त करतात ?

**किंवा**

नारायण सुर्व्यांनी लालसेला बळी न पडता स्वाभिमानाने जगण्याचे तत्त्वज्ञान कशाप्रकारे सांगितले आहे ? 8

(ब) बबन सराडकरांनी बळीराजाला सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा कशाप्रकारे अभिव्यक्त केल्या आहे ?

**किंवा**

बा.सी. मर्ढेकरांनी 'पोरसवदा होतीस' या कवितेतून मातृत्वाचा कशाप्रकारे सन्मान केला आहे ? 8

4. (अ) जाहीर निवेदन म्हणजे काय ते सांगून जाहीर निवेदनाचे हेतू स्पष्ट करून सांगा ?

**किंवा**

जाहीर निवेदन कसे तयार करावे ? ते सविस्तर लिहा. 8

(ब) जाहिरात म्हणजे काय ते सांगून जाहिरातीचे प्रकार स्पष्ट करा.

**किंवा**

रेडिओसाठी जाहिरात तयार करतांना कोणती काळजी घ्यावी ? ते समजावून सांगा. 8

5. खालील बहुपर्यायी प्रश्नांची अचूक उत्तरे लिहा :—

(1) वि.भि. कोलते यांच्या आत्मकथनाचे नाव काय ?

(अ) एकला चलो रे (ब) एकांतवास

(क) अजुनी चालतोच वाट (ड) उद्याची वाट

(2) डॉ. पंजाबरावांना विदर्भाचे ________ म्हणून ओळखले जाते.

(अ) समाजसेवक (ब) पंचप्राण

(क) राष्ट्रपुरुष (ड) महामानव

(3) कम्युनिस्ट कामगार नेते म्हणून कोण परिचित आहेत ?

(अ) गोविंद पानसरे (ब) नरेंद्र दाभोळकर

(क) श्याम मानव (ड) स्वामी विवेकानंद

(4) दऱ्या-कपारीत राहणारे ________ अजून तिथेच आहेत.

(अ) दरोडेखोर (ब) प्रज्ञावंत

(क) धनगर (ड) ज्ञानी

(5) 'स्वराज्य संकल्पिका राष्ट्रमाता जिजाऊ' या पाठाचे लेखक कोण ?

(अ) अशोक राणावत (ब) गोविंद पानसरे

(क) अशोक पानसरे (ड) अशोक राणा

(6) 19 फेब्रुवारी _______ रोजी शिवनेरीवर शिवबा जन्माला आले.

(अ) 1627 (ब) 1628

(क) 1629 (ड) 1630

(7) कोणत्या बखरीस प्राचीन मराठी गद्यशैलीचा उत्तम नमुना मानले जाते ?

(अ) शालीवाहन (ब) महिकावतीच्या

(क) शिवकालीन (ड) भाऊसाहेबांच्या

(8) आप मेला ________ बुडाले. आबरू जाते आणि वाचतो कोण ?

(अ) जग (ब) युग

(क) राज्य (ड) धन

(9) 'अरणी' कथेचे लेखक कोण आहेत ?

(अ) सखा कलाल (ब) मारूती चित्तमपल्ली

(क) रमेश चित्तमपल्ली (ड) रामा कलाल

(10) जंगलात ________ लहान लहान वरत्त्या होत्या.

(अ) माणसांच्या (ब) प्रवाश्यांच्या

(क) आदिवासींच्या (ड) मजुरांच्या

(11) सखा कलालांच्या कथेचा नायक कोण आहे ?

(अ) कृष्णा (ब) नामा

(क) रामा (ड) शामा

(12) फणसाअंगी कांटे । आंत ________ सांठे ।।

(अ) जीवनाचे (ब) फळांचे

(क) बियांचे (ड) अमृताचे

(13) थांब उद्याचे माउली, तीर्थ ________ घेईतो.

(अ) पायांचे (ब) अमृताचे

(क) आकाशांचे (ड) गंगेचे

(14) _______ बोलून आयुष्य कुणालाही सजवता येते.

(अ) मतलबी (ब) सत्य

(क) स्पष्ट (ड) झूट

(15) 'चित्रालिपी' हा काव्यसंग्रह कुणी लिहिला ?

(अ) नारायण सुर्वे (ब) वसंत आबाजी डहाके

(क) बबन सराडकर (ड) नारायण कुळकर्णी कुवठेकर

(16) हे माझ्या गवताच्या पात्या' या काव्यसंग्रहाचे कवी कोण ?

(अ) नारायण सुर्वे (ब) बबन सराडकर

(क) नारायण कुळकर्णी कवठेकर (ड) वसंत आबाजी डहाके 16×1=16

139 139 139 139 139